प्रेसनोट दिनांक ११/०२/२०२५

**शहर वाहतूक उपशाखा कल्याण, ठाणे शहर येथील पोलीस हवालदार/६८९० प्रविण गुलाब गोपाळे, यांना सापळा कारवाई करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी घेतले ताब्यात**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | ठाणे |
| **स्टेशन डायरीनोंद क्र.** | महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन, ठाणे शहर पोलीस आयुक्तालय.<br>स्टेशन डायरी नोंद क्र. ५५/२०२४ वेळ १८:४० वा. |
| **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | १) प्रविण गुलाब गोपाळे, पोहवा/६८९० वय ४१ वर्षे,<br>नेमणुक– शहर वाहतुक उपशाखा कल्याण, ठाणे शहर. |
| **मागितलेल्या लाचेची रक्कम** | ७००/–रूपये |
| **तडजोडीअंती स्वीकारलेल्या लाचेची रक्कम** | ५००/–रूपये |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांचा ट्रान्सपोर्ट व्यवसाय असून त्यांचा महींद्रा बोलेरो पिकअप टेम्पो क्रं एम.एच ०५ बी एच ७१८९ या वाहनास कल्याण मध्ये माल वाहतूकी दरम्यान कोठेही न अडवण्या करीता दर महीना ७००/– रुपये ची कल्याण वाहतूक विभागातील शहाड वाहतूक चौकीतील पोहवा प्रविण गोपाळे यांनी मागणी करुन, पैसे दिले नाही तर प्रत्येक चौकात गाडी अडवून कारवाई करणार असल्याबाबत सांगीतले होते. नमुद आशयाची तक्रार तक्रारदार यांनी दि. ०४/०२/२०२५ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे दिलेली होती. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०४/०२/२०२५ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक प्रविण गुलाब गोपाळे, पोहवा/६८९० नेम. कल्याण वाहतूक विभाग, वय ४१ वर्षे, यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडी अंती ५००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून लाप्रवि ठाणे यांनी दिनांक ११/०२/२०२५ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करून लोकसेवक प्रविण गुलाब गोपाळे, पोहवा/६८९० यांना तक्रारदार यांच्याकडुन शहाड वाहतूक चौकीमध्ये ५००/– रू. लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन, ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे.
२. मा. श्री संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन, ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे.
३. मा. श्री सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन, ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे.

---

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.

संपर्कपत्ता :–ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर ठाणे पश्चिम ४००६०१
सकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane @mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोलफ्रि नंबर :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्स ॲप नं :– ९९३०९९७७००

( राजेश जागडे )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे
सत्यमेव जयते